# आठ स्थानकांच्या छताचे काम पूर्ण; भुयारीकरणही पूर्णत्वाकडे

# मेट्रो-3 स्थानकांच्या कामाला वेग

म. टा. प्रतिनिधी

**मुंबई :** मेट्रोच्या कारशेडचा तिढा अद्याप सुटला नसला, तरी मेट्रो मार्गांची अन्य कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. कुलाबा ते सीप्झ मेट्रो-३ या संपूर्ण भुयारी मार्गिकेवरील कफ परेड स्थानकाच्या छताच्या स्लॅबचे काम पूर्ण झाले आहे. या मार्गिकेवरील आठ स्थानकांच्या छताच्या स्लॅबचे काम पूर्ण झाले आहे. पॅकेज-१ अंतर्गत येणाऱ्या सर्व स्थानकांच्या छताचे काम पूर्ण झाल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून (एमएमआरसीएल) सांगण्यात आले आहे.



**या स्थानकांच्या स्लॅबचे काम पूर्ण**
मरोळ नाका, सीप्झ, एमआयडीसी, मुंबई सेंट्रल, कफ परेड, विधान भवन, चर्चगेट, हुतात्मा चौक
**८२ टक्के काम पूर्ण :** कफ परेड स्थानक

बहुप्रतीक्षित कुलाबा ते सीप्झ मेट्रो मार्गिकेच्या भुयारीकरणाचे ९७ टक्के काम पूर्ण झाले आहे. यातील केवळ मुंबई सेंट्रल ते वरळी दरम्यानच्या पॅकेज-३ अंतर्गत येणाऱ्या मार्गिकेच्या भुयारीकरणाचे काम शिल्लक आहे. सध्या या टप्प्यातील ७९ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

'एमएमआरसीएल'कडून स्थानकांची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सद्यस्थितीत स्थानकांचे ७३ टक्के काम पूर्णत्वाला गेले आहे. यातील मरोळ नाका, सीप्झ, एमआयडीसी, मुंबई सेंट्रल, कफ परेड, विधान भवन, चर्चगेट आणि हुतात्मा चौक या स्थानकांच्या छताच्या स्लॅबचे संपूर्ण काम पूर्ण झाले आहे, तर कफ परेड स्थानकाचे ८२ टक्के काम पूर्ण झाले आहे. सध्या स्थानकाच्या प्रवेशद्वारांचे बांधकाम, प्लॅटफॉर्म स्लॅब तसेच अँसिलिअरी इमारतीचे बांधकाम सुरू आहे. अन्य स्थानकांच्या पुनर्भरणाचे आणि विविध सेवांकरिता कक्ष बांधण्याचे काम सुरू आहे, असे 'एमएमआरसीएल'कडून सांगण्यात आले.



## गाडीच्या चाचणीसाठी प्रयत्न

मेट्रो गाडीच्या चाचणीसाठी सध्या प्रयत्न सुरू आहेत. मेट्रो-३ची आठ डब्यांची एक रेल्वेगाडी या वर्षअखेरपर्यंत मुंबईत दाखल होणार आहे. मेट्रो मार्गिकेला भुपृष्ठभागाशी जोडण्यासाठी सारिपूत नगर येथे २२५ मीटर लांबीचा रॅम्प बांधला जात आहे. या रॅम्पच्या मुखाशी गाडीच्या चाचण्या होणार आहेत. ही गाडी मरोळ-मरोशी मार्गावर उभारण्यात येणाऱ्या तात्पुरत्या सुविधा जागेवर पार्क केली जाणार आहे. त्यामुळे कारशेड उपलब्ध नसली, तरी गाडीच्या मार्गिकेवरील चाचण्यांचा मार्ग मोकळा झाला आहे. आतापर्यंत आठ डब्यांच्या दोन मेट्रो गाड्यांची कारखान्यात बांधणी पूर्ण झाली आहे. तिसऱ्या गाडीची बांधणी सुरू आहे, असे 'एमएमआरसीएल'ने सांगितले.